# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 फॅक्स क्र. 0712-2561663

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-3/2017/ 2889

दिनांक:- 12 OCT 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व **BE/B.Tech & ME/M.Tech** संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील BE/B.Tech & ME/M.Tech अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. 2अ/एडीएम/यादी पडताळणी/2017/1113, दि. 16.09.2017

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम वर्ष MBA व MCA पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार आहेत. पडताळणी करतांना सर्वसाधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे.

1. राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची आपल्या संस्थेतील प्राचार्यांनी/ संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेत सर्व प्रकारच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी केली असल्याचे संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीच्या वेळेस सोबत आणावे.
2. गुणवत्ता यादी पडताळणीसाठी संचालनालयाचा सांकेतांक व पासवर्डद्वारे Online पध्दतीने Login करुन संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांची यादीची Printout घेऊन ती पडताळणीकरीता उपयोगात आणली जाईल कोणत्याही परिस्थित संचालनालयाच्या स्थळाव्यतीरीक्त (उदा. Word / Excel file etc.) पडताळणीकरीता वापरली जाणार नाही.
3. प्रवेश नियमांचे उल्लंघण करुन अथवा मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे किंवा Cut-Off Date नंतर प्रवेश करणाऱ्या / Upload करणाऱ्या संस्थांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करुन संचालनालयास सादर करण्यात येऊन शासन नियमानुसार दंडात्मक कार्यवाहीनंतर आपल्या संस्थेच्या गुणवत्ता याद्या मंजुर करण्यात येतील. जास्तीचे प्रवेश किंवा Cut-Off Date नंतरचे प्रवेश करणे / प्रवेश Upload करणे या प्रकरणी यादी मंजुर करुन ती मंजुर कदण्याची प्रवेश नियंत्रण समिती मुंबई येथे शिफारस केल्यानंतर संचालनालयास दंडात्मक कार्यवाहिसाठी सादर करण्यात येणार नाही या बाबीची गांभिर्याने नोंद घ्यावी.
4. **गुणवत्ता यादीत काही अनियमीतता आढळुन आल्यास गंभीर कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**
5. पडताळणी करतांना उमेदवारांचे प्रवेश रद्द केले/ झाले तर संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या Login मधुन Online पध्दतीने अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करुन त्यानंतर गुणवत्ता यादीची Printout

घेऊन त्यानुसार पडताळणी करण्यात येईल. गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर आढळुन आलेल्या सर्व त्रुटींची पुर्तता आपल्या संस्थेनी दिलेल्या वेळेत करावी.

6. **गुणवत्ता यादीतील जात वैधता प्रमाणपत्राव्यतीरिक्त अन्य सर्व त्रुटी पुर्ण करणे आवश्यक आहे व त्या त्रुटी पुर्ण केल्यानंतर त्या यादीमध्ये केवळ प्रवेशित उमेदवाराच्या जात वैधतेव्यतिरिक्त कोणतीही त्रुटी मा. आयुक्त राज्य सामायीक प्रवेश परिक्षा, नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा (पुर्व), मुंबई यांना सादर करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

7. या कार्यालयाच्या स्तरावर संस्थेची गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीतील वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील क्रमांकाचा उल्लेख करुन तसे पत्र प्रवेश नियामक प्राधिकरण व संबंधित विद्यापीठास कळविण्यात येईल तसेच गुणवत्ता यादीची पडताळणी केल्यानंतर त्या यादीची मुळ प्रत या कार्यालयात ठेवण्यात येईल व पडताळणी केलेल्या यादीची एक Xerox प्रत अनुक्रमे प्रवेश नियंत्रण समिती आणि संबंधित संस्थेस देण्यात येईल व संचालनालयास केवळ पत्राची प्रत या कार्यालयाद्वारे सादर करण्यात येईल.

8. **गुणवत्ता यादी पडताळणी करतेवेळी शुल्क परताव्याबाबत आपल्या संस्थेबद्दल काही तक्रारी आहे किंवा कसे याची शहानीशा करुन व तक्रार असल्यास ती नियमानुसार निवारण करण्यात आली किंवा कसे याची पडताळणी केल्यानंतर गुणवत्ता यादी पडताळणीची कार्यवाहि करण्यात येईल. शुल्क परतावा किंवा परत न करणे अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण झालेले नसल्यास प्रवेश नियमावलीतील नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व यापुढे अशा प्रकारचे नियमबाह्य कृत्य होणार नाही असे प्राचार्याकडुन लेखी हमीपत्र सादर केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणी करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. तसेच शुल्क परताव्याबाबत संस्थेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र आपले संस्थेतील प्राचार्याकडुन सादर करावे.**

9. नवीन संस्थांनी आवश्यक रक्कमेची नियत ठेव (Fix Diposit) भरणा केली आहे किंवा नाही याबाबतसुध्दा प्राचार्यांनी माहिती द्यावी. ठेव भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर गुणवत्ता यादीची पडताळणी करण्यात येईल तसेच शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडुन प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवाणगी देण्यात आलेली आहे. अशा संस्थांकडुन शासनास भरणा करावयाच्या नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत त्यानुसार अशा संस्थांनी नोंदणी शुल्क भरण्यात यावी याची नोंद घ्यावी.

10. **राज्य CET कक्षाद्वारे व संचालनालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रीयाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत त्वरीत पडताळणी करुन प्रवेश नियामक प्राधिकरणला सादर करणे गरजेचे असल्याने त्यानुसार आपण आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार त्वरीत पडताळणी करुन घ्यावी.**

गुणवत्ता यादी मंजुर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाह्य प्रवेश अथवा कोणत्याही प्रकारची अनियमीतता असल्याचे आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील. गुणवत्ता यादी पडताळणीकरीता येतांना सोबत तपासणीकरीता लागणारे साहित्य जसे की **Paper Rim, Calculator, Stapler, Punching Machine, Pen (Red & Blue), Flag etc.** सोबत आणने आवश्यक आहे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

सहपत्र- 1) वेळापत्रकाची प्रत
2) संदर्भांकीत पत्राची प्रत

# गुणवत्ता यादी तपासणी वेळापत्रक शै. वर्ष- 2017-18

## अभ्यासक्रमाचे नांव - BE & ME/MTECH

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4004 | Government College of Engineering, Chandrapur | BE | 357 | 302 | दि. 23 ऑक्टो. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| 2 | 4005 | Laxminarayan Institute of Technology, Nagpur | BE | 141 | 140 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 60 | 39 | |
| 3 | 4025 | Government College of Engineering, Nagpur | BE | 315 | 309 | दि. 24 ऑक्टो. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| 4 | 4104 | Kavi Kulguru Institute of Technology & Science, Ramtek | BE | 567 | 370 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 72 | 0 | |
| 5 | 4115 | Shri Ramdeobaba College of Engineering and Management, Nagpur | BE | 839 | 834 | दि. 25 & 26 ऑक्टो. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 126 | 103 | |
| 6 | 4116 | Ankush Shikshan Sanstha's G.H.Raisoni College of Engineering, Nagpur | BE | 945 | 940 | दि. 27 & 30 ऑक्टो. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 234 | 130 | |
| 7 | 4118 | Yashwant Rural Education Society's Bapurao Deshmukh Engineering College,Sevagram | BE | 530 | 246 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 114 | 31 | |
| 8 | 4123 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha, Priyadarshani College of Engineering, Nagpur | BE | 816 | 619 | दि. 31 ऑक्टो. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 97 | 6 | |
| 9 | 4133 | Sanmarg Shikshan Sanstha's Smt. Radhikatai Pandav College of Engineering, Nagpur | BE | 470 | 101 | दि. 1 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 18 | |
| 10 | 4134 | Guru Nanak Institute of Engineering & Technology,Kalmeshwar, Nagpur | BE | 410 | 105 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 18 | 3 | |
| 11 | 4135 | Amar Seva Mandal's Shree Govindrao Vanjari College of Engineering & Technology, Nagpur | BE | 315 | 75 | |
| | | | Direct II | | | |
| 12 | 4136 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sastha, Priyadarshini J. L. College Of Engineering, Nagpur | BE | 315 | 178 | |
| | | | Direct II | | | |
| 13 | 4137 | Sir Shantilal Badjate Charitable Trust's S. B. Jain Institute of technology, Management & Research, Nagpur | BE | 441 | 387 | दि. 2 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| 14 | 4138 | Jaidev Education Society, J D College of Engineering and Management, Nagpur | BE | 567 | 507 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 96 | 15 | |
| 15 | 4139 | Samridhi Sarwajanik Charitable Trust, Jhulelal Institute of Technology, Nagpur | BE | 347 | 224 | दि. 3 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 43 | |
| 16 | 4141 | Shriram Gram Vikas Shikshan Sanstha, Vilasrao Deshmukh College of Engineering and Technology, Nagpur | BE | 189 | 15 | |
| | | | Direct II | | | |
| 17 | 4142 | Ankush Shikshan Sanstha's G. H. Raisoni Institute of Engineering & Technology, Nagpur | BE | 252 | 103 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 66 | 12 | |

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 4143 | Sanmarg Shikshan Sanstha, Mandukarrao Pandav College of Engineering, Bhandara,Nagpur | BE | 342 | 90 | दि. 6 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| 19 | 4144 | Shri. Sai Shikshan Sanstha, Nagpur Institute of Technology, Nagpur | BE | 378 | 232 | |
| | | | Direct II | | | |
| 20 | 4145 | Wainganga College of Engineering and Management, Dongargaon, Nagpur | BE | 443 | 153 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 144 | 13 | |
| 21 | 4146 | KDK College of Engineering, Umrer, Nagpur | BE | 189 | 0 | दि. 7 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| 22 | 4147 | K.D.K. College of Engineering, Nagpur | BE | 659 | 580 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 36 | 29 | |
| 23 | 4151 | Vidarbha Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Tulshiramji Gaikwad Patil College of Engineering & Technology, Nagpur | BE | 504 | 268 | दि. 8 & 9 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 114 | 86 | |
| 24 | 4163 | Rajiv Gandhi College of Engineering Research & Technology Chandrapur | BE | 547 | 338 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 54 | 10 | |
| 25 | 4165 | Gondia Education Society's Manoharbhai Patel Institute of Engineering and Technology, Gondia | BE | 379 | 185 | |
| | | | Direct II | | | |
| 26 | 4167 | Yeshwantrao Chavan College of Engineering,Wanadongri, Nagpur | BE | 1065 | 1060 | दि.10 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 261 | 73 | |
| 27 | 4171 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's , Priyadarshini Institute of Engineering and Technology, Nagpur | BE | 441 | 371 | दि. 13 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 54 | 19 | |
| 28 | 4172 | Anjuman College of Engineering & Technology, Nagpur | BE | 504 | 364 | दि.14 & 15 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 36 | 17 | |
| 29 | 4174 | ST. Vincent Pallotti College of Engineering & Technology, Nagpur | BE | 441 | 398 | |
| | | | ME | 36 | 7 | |
| 30 | 4175 | JMSS Shri Shankarprasad Agnihotri College of Engineering, Wardha | BE | 252 | 73 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 24 | 13 | |
| 31 | 4177 | Priyadarshini Bhagwati College of Engineering, Harpur Nagar, Umred Road,Nagpur | BE | 378 | 215 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 42 | 5 | |

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 4178 | Rajiv Gandhi College of Engineering & Research, Hingna Road, Nagpur | BE | 567 | 411 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 18 | 2 | |
| 33 | 4179 | Lokmanya Tilak Jankalyan Shiksan Sanstha, Priyadarshini Indira Gandhi College of Engineering, Nagpur | BE | 378 | 220 | |
| | | | Direct II | | | |
| 34 | 4180 | Shrimati Rajashri Mulak College of Engineering for Womens, Nagpur | BE | 189 | 20 | |
| | | | Direct II | | | |
| 35 | 4181 | Sarvasiddhanta Education Soc's Nuva College of Engineering and Technology, Nagpur | BE | 252 | 24 | |
| | | | Direct II | | | दि.16 & 17 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | ME | 72 | 18 | |
| 36 | 4184 | Om Arunodaya Bahuuddeshiya Khadi Garmudyog Vikas Sanstha's Om College of Engineering, Inzapur, Wardha | BE | 235 | 0 | |
| | | | Direct II | | | |
| 37 | 4185 | Shree Bapuraoji Deshmukh Foundation, Suresh Deshmukh College of Engineering, Selukate, Wardha | BE | 252 | 0 | |
| | | | Direct II | | | |
| 38 | 4186 | Datta Meghe Institute of Medical Science's Datta Meghe Institute of Engineering & Technology & Research, Savangi (Meghe) | BE | 504 | 255 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 24 | 6 | |
| 39 | 4187 | Dr. Babasaheb Ambedkar College of Engineering and Research, Wanadongri, Nagpur | BE | 378 | 209 | |
| | | | Direct II | | | |

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 40 | 4188 | Krushi Jivan Vikas Pratishthan, Ballarpur Institute of Technology, Mouza Bamni | BE | 504 | 198 | दि.18 & 20 नोव्हें. 2017 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 90 | 48 | |
| 41 | 4189 | Sardar Patel Memorial Society's Namdevrao Poreddiwar College of Engineering and Technology, Gadchiroli | BE | 189 | 23 | |
| | | | Direct II | | | |
| 42 | 4190 | M.D. Yergude Memorial Shikshan Prasarak Mandal's Shri Sai College of Engineering & Technology, Badravati | BE | 315 | 80 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 24 | |
| 43 | 4192 | Maitraya Education Society, Nagarjuna Institute of Engineering Technology & Management, Nagpur | BE | 252 | 69 | |
| | | | Direct II | | | |
| 44 | 4193 | K.D.M. Education Society, Vidharbha Institute of Technology,Umred Road ,Nagpur | BE | 378 | 67 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 90 | 56 | |
| 45 | 4195 | Vidharbha Bahu uddeshiya Shikshan Sanstha's Abha Gaikwad - Patil College of Engineering, Nagpur | BE | 315 | 32 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 66 | 63 | |
| 46 | 4196 | Gurunanak Educational Society's Gurunanak Institute of Technology, Nagpur | BE | 504 | 89 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 37 | |
| 47 | 4197 | Jai Mahakali Shikshan Sanstha, Agnihotri College of Engineering, Sindhi(Meghe) | BE | 315 | 14 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 10 | |
| 48 | 4285 | V M Institute of Engineering and Technology, Dongargaon, Nagpur | BE | 315 | 0 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 48 | 20 | |
| 49 | 4301 | ITM College of Engineering, Nagpur | BE | 315 | 23 | |
| | | | Direct II | | | |
| 50 | 4302 | Gondia Education Society's Manoharbhai Patel Institute Of Engineering & Technology, Shahapur, Bhandara | BE | 228 | 141 | |
| | | | Direct II | | | |
| 51 | 4303 | Vidya Niketan Institute of Engineering and Technology, Nagpur | BE | 189 | 0 | |
| | | | Direct II | | | |
| 52 | 4304 | Cummins College of Engineering For Women, Sukhali (Gupchup), Tal. Hingna Hingna Nagpur | BE | 189 | 91 | |
| | | | Direct II | | | |
| 53 | 4305 | G.H.Raisoni Academy of Engineering & Technology, Nagpur | BE | 378 | 126 | |
| | | | Direct II | | | |
| | | | ME | 42 | 29 | |
| 54 | 4613 | Suryodaya College of Engineering & Technology, Nagpur | BE | 283 | 96 | |
| | | | Direct II | | | |
| 55 | 4648 | R.V. Parankar College of Engineering & Technology, Arvi, Dist Wardha | BE | 252 | 12 | |
| | | | Direct II | | | |
| 56 | 4649 | Bajaj Institute of Technology, Wardha | BE | 252 | 233 | |
| | | | Direct II | | | |

**टिप-गुणवत्ता यादीची पडताळणी झाल्यानंतर त्रुट्यांची पुर्तता 1 आठवड्याच्या आत करावी**

Joint Director
Technical Education
R. O. NAGPUR

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/2264115: फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/ यादी पडताळणी/२०१७/ ९११३
दिनांक : 16 SEP 2017

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादी पडताळणी करणेबाबत.....

संदर्भ : १) प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक बैठक १५१७/ प्र.क्र.१२५८/प्रनिप्रा/३२७, दिनांक २२.८.२०१७
२) संचालनालयात आयोजित केलेली दिनांक ७.९.२०१७ रोजीची बैठक

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५ लागू झाला असून त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने दिनांक २४.४.२०१७ रोजी शासनाने राजपत्राद्वारे प्रवेश पात्रता व प्रवेश नियम प्रसिध्द केले आहेत.

प्रवेश नियमातील मुद्दा क्रमांक १४ मध्ये प्रवेश यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता देण्याबाबतची तरतूद नमूद केली आहे. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५ च्या कलम ९ पोटकलम ५ मध्ये नमूद केल्यानुसार **प्रत्येक विनाअनुदानीत संस्था प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करील , प्रत्येक संस्था संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव अशा प्रमाणीकरणाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालमर्यादेच्या आत प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील असे स्पष्ट केले आहे.** त्यानुसार कळविण्यात येते की , शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादया संचालकांच्या वतीने पडताळणी करण्यासाठी आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश यादी शासनाने प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियम व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पडताळणी करून ती वर नमूद केलेल्या मुदतीचा विचार करता कट ऑफ डेटनंतर दोन महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक १५.१०.२०१७ पर्यंत मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी ही बाब दिनांक ७.९.२०१७ रोजीच्या संचालनालयात आयोजित केलेल्या बैठकीमध्ये अवगत करण्यात आलेली आहे.

प्रवेश यादी पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

१. प्रवेश यादी पडताळणीसाठी आपल्या कार्यालयास देण्यात आलेल्या संकेतांक व पासवर्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने लॉगइन करून संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी. कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदा.Word File etc.) पडताळणीकरिता वापरू नये.
२. प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर सदर संस्थेस सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI/COA) परवानगी असल्याचे कागदपत्र पडताळणी करण्यात यावेत.
३. नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (F D) भरणा केली आहे किंवा नाही याची पडताळणी करावी , भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार आपल्या विभागातील अशा संस्थांकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे. या अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.
४. अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीवेळी तपासणे.
५. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादया पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे ही बाब पडताळणी पथकास सूचित करावी. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने प्रसिध्द केलेले असाधारण राजपत्र क्रमांक १०२ मध्ये तसेच पदवी

आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

६. प्रवेश यादी पडताळणीमध्ये सर्व विभागांमध्ये एकसूत्रता असण्याच्या दृष्टीने प्रवेशयादीमध्ये आढळून येणा-या अनियमिततेबाबत संचालनालयास अवगत करून प्राप्त होणा-या मार्गदर्शनानुसार यादी पडताळणी करण्याची कार्यवाही करावी व तशा सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

७. विभागीय कार्यालयांनी पडताळणी केलेल्या व न केलेल्या प्रवेशयादयांची (त्रुटी अहवालासहीत ) संस्थानिहाय माहिती तक्त्याच्या स्वरूपात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे पाठविण्यात यावी जेणेकरून प्रलंबित राहिलेल्या संस्थांची यादी त्वरीत उपलब्ध होऊ शकेल व अशा संस्थांवर करावयाची कारवाई निश्चित करणे सुलभ होईल.

८. संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत संबंधित संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरण व या संचालनालयास सादर करण्यात यावा मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच शुल्क परतावा बाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून घेण्यात यावे.

९. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

१०. महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये **उशिरा प्रवेश /प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे,मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही.** ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश रद्दबातल ठरविण्यात यावेत व तसे प्रवेश नियामक प्राधिकरणासही कळविण्यात यावे.

११. ज्या अभ्यासक्रमांची शैक्षणिक अर्हता पदवी अभ्यासक्रमाचे गुणांवर आधारीत आहे अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित विद्यापीठांकडून पदवीसाठी ग्रेड ज्या गुणांवर देण्यात येते ते गुण विचारात घेऊन पात्रता निश्चित करण्यात यावी.

१२. प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच या संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१३. प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी सादर करण्यासाठी संस्थेने विहीत दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक

असल्याचे आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावे.

१४. मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता प्रकरणी दिलेल्या मुदतवाढी संदर्भातील सूचना विचारात घेऊन अशा प्रकरणी पडताळणी करावी.

१५. आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त असलेलया **सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था यांमधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतिरिक्त संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रवेश यादीची पडताळणी करण्यात यावी.**

१६. ज्या उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत ॲलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले Seat Acceptance शुल्क भरले नाही आणि एआरसी मध्ये रिपोर्ट केला नाही अशा उमेदवारांना संबंधित संस्थेत थेट जाऊन प्रवेश निश्चित करण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र अशा प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आकारण्यात येणारे रुपये १०००/-प्रोसेसिंग चार्जेस संस्थांनी आकारून ते एकत्रितरित्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे विद्यार्थ्यांच्या नाव आणि ॲप्लीकेशन आय डी सह सादर करणे आवश्यक राहील असेही कळविण्यात आलेले होते त्यानुसार संस्थांनी कार्यवाही केल्यानंतर त्या प्रवेशाची पडताळणी करावी.

१७. प्रवेशित उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी होऊन नोंदणी झालेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.(PMSSS - J & K उमेदवारांचा अपवाद वगळून)

१८. एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च वा मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

१९. पडताळणी केलेल्या प्रवेश यादीची एक प्रत संबंधित विद्यापीठाकडे अग्रेषित करावी.

प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची व्यक्तीशः नोंद घ्यावी.

(**मीता राजीवलोचन,** भा.प्र.से)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सादर

E:\Budage\2017-18\Merit List\letter to ALL RO for verification of Merit List.docx